
# येशू उत्कृष्टपणे कथा-वृत्तांत सांगत असे

येशूचे कथा-वृत्तांत शिकण्यास आणि ते इतरांना सांगण्यास मुलांना मदत करा

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभू, येशूने क्षमा न करणाया कृतघ्न दासाचा वृत्तांत सांगितला त्यावरुन मुलांना इतरांना क्षमा करण्यास साहाय्य कर.''



पुढीलपैकी मुलांसाठी कोणतेही शैक्षणिक कार्यक्रम निवडा.

मुलांना हे चित्र काढायला सांगा.

मोठया मुलाने किंवा शिक्षकाने कृतघ्न चाकराचा वृत्तांत वाचून दाखवावा किंवा सांगावा (मत्तय 18:21-34). आमचे वाईट करणारे, आमच्या विरुद्ध अपराध करणायांना आम्ही नेहमी-सतत क्षमा केली पाहिजे हे येशू ह्या कथा वृत्तांतावरुन आम्हांला स्पष्ट करुन सांगतो.

कथा वृत्तांत सांगून झाल्यावर पुढील **प्रश्न विचारा.** *(प्रत्येक प्रश्नांतर उत्तरे दिली आहेत).*

- आम्ही लोकांना क्षमा करण्याचे थांबवले पाहिले का? *(वाहा वचन 21. आम्ही सतत क्षमा करीत राहीले पाहिजे).*
- आपले कर्ज फेडण्याची ऐपत नसणाफ्रया चाकराचे धन्याने काय केले? *(वाहा वचन 27)*
- त्याच चाकराचा कर्जदार असलेल्या दुसफ्रया चाकराशी तो चाकर कसे वागतो? *(पाहा वचन 30)*
- त्याचे कृत्य समजल्यावर धन्याने काय केले? *(पाहा वचन 34)*
- आमचे वाईट करणाफ्रयांशी आम्ही कसे वागावे अशी देवाची इच्छा आहे? *(पाहा वचन 35)*

कृतघ्न चाकराच्या दृष्टांताचे **नाट्यीकरण करा.** मुलांना ही नाटिका सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढ्रायांशी चर्चा करुन व्यवस्था करा. मुलांकडून नाटिकेची तयारी करुन घ्या. तुम्ही सर्व भूमिका केल्यापाहिजेत असे नाही. मोठया मुलांनी लहान मुलांची तयारी करुन हयावी.

- **मोठया मुलांनी किंवा प्रौढांनी निवेदक धनी** (हातात कागद घ्या) आणि कृतघ्न चाकर, हया भूमिका कराव्यात.
- **लहान मुलांनी** पेत्र, मित्र, तुरुंग अधिकारी आणि दुसरा चाकर ह्या भूमिका कराव्यात.

**निवेदक:** वचने 21-27 मधून कथा वृत्तांताचा पहिला भाग सांगून म्हणा, ''पेत्र येशूला काय विचारतो ले ऐका''.

**पेत्र :** वर पाहून म्हणा, ''किती वेळा मी माझ्या भावाला क्षमा करावी?''

**निवेदक :** ''या प्रश्नाचे उत्तर येशूने धनी आणि त्याचा चाकर हयांच्या कथा वृत्तांतातून दिले. हा चाकर आपल्या धन्याचे बरेच देणे लागत होता. धनी काय म्हणतो ते ऐका.''

**धनी :** ''हा तुझ्या कर्जाचा कागद आहे. ह्या कागदावरुन मला बरेच देणे लागतोस असे दिसते. तू माझे सर्व देणे ताबडतोब फेडून टाक, नाहीतर मी तुला आणि तुझ्या कुटुंबाला गुलाम म्हणून विकून टाकतो''.

**कृतघ्न चाकर :** गुडघे टेकून याचना करा, ''दया करा महाराज! मी आपले सर्व कर्ज फेडीन. कृपा करुन मला वागवून घ्या!''

**धनी :** हातातला कागद फाडून टाका आणि म्हणा. ''जा मी तुझ्यावर दया केली आहे. मी तुझे सर्व कर्ज माफ करुन टाकले आहे''.

**निवेदक :** वचने 28-35 मधून कथा वृत्तांताचा दुसरा भाग सांगून म्हणा, ''आता हा कृतघ्न चाकर काय करतो ते पाहा.''

**कृतघ्न चाकर :** राजा समोरुन बाजूला व्हा आणि दुसया चाकराकडे जा. त्याला गदगदा हालवून म्हणा. ''तू माझे पैसे आत्ताच्या आत्ता मला परत कर!''

**दुसरा चाकर :** त्याच्यासमोर गुडघे टेकून विनंती करा, ''कृपा करुन माझ्यावर दया करा. मी लवकरच तुमचे पैसे फेडीन.''

**कृतघ्न चाकर :** ''मुळीच नाही! कोण आहे रे तिकडे ताबडतोब ह्याला पकडून तुरुंगात टाका!''

**तुरुंग अधिकारी :** त्या दुसृया चाकराला ओढत नेत म्हणा. ''तू तुझे सर्व कर्ज फेडीपर्यन्त तुरुंगात राहा''.

**मित्र :** ''राजाकडे जाउन सांगा, ''महाराज तुम्ही आता ज्या चाकराला क्षमा केलीत-त्याचे कर्ज माफ केलेत. तो मात्र दुृया चाकराला माफ करण्यास तयार नाही! त्याने छोटया रकमेचे कर्ज असणृयाला तुरुंगात टाकले!''

**राजा :** कृतघ्न चाकराला बोलवा, ''ये असा इकडे ये!'' (कृतघ्न चाकर येतो).

**कृतघ्न चाकर :** धन्याकडे धावत जा त्याच्यासमोर गुडघे टेकून म्हणा, ''काय आज्ञा महाराज. तुम्ही मोठे थोर आणि उदार मनाचे आहात!''


**धनी :** (संतापून), ''मी तुला क्षमा केली,तशीच तू का केली नाहीसे? घेऊन जा आणि तुरुंगात टाका!''

**तुरुंग अधिकारी :** कृतघ्न चाकराला ओढत नेऊन म्हणा, ''आता तुझे सर्व कर्ज फिटेपर्यन्त तू तुरुंगात पड्''.

**निवेदक किंवा मोठे मूल :** मदत करणृयांचे आभार माना.

मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढ़ांसमोर सादर केले असेल तर वर दिलेले प्रश्न मुलांना त्यांना विचारण्यास सांगा.

**मुलांना विचारा :** येशूने लोकांना देवाच्या राज्याविषयासाठी सांगितलेल्या कथा वृत्तांतांची इतर उदाहरणे कोणती?'' (मुलांना उदाहरणे सांगू द्या).



**चित्र काढा** राजाचा राजमुगूट. मुलांनी असेच चित्र काढून पुढच्या उपासनेच्या वेळी मोठया माणसांना किंवा धरी आपल्या पालकांना दाखवावे.

- राजाचा राजमुगूट येशूची कथा वृत्तांत स्पष्ट करतो हे मुलांना समजून सांगू द्या.
- देव आमचा आध्यात्मिक राजा आहे. आमचे सर्व काही हे त्याचेच आहे म्हणजे आम्ही सर्वकाही त्याला देणे लागतो.
- कधी कधी आम्ही केली पाहिजे त्याला देणे लागता.
- आमचा धनी असलेल्या येशूने आमची क्षमा केली आहे तशी आम्हीही इतरांची क्षमा करणे अगत्याचे आहे.

**पाठ करा** कलस्सै 3:16

**कविता:** तीन मुलांना स्तोम 45:1, 2 आणि 4 ही वचने एकेक म्हणण्यास सांगा.

**मोठया मुलांनी** येशूच्या विश्वासू चाकराच्या कथा वृत्तांता वरुन कविता, गीत किंवा नाटिका करावी. आठवडयामध्ये ते कधीही कष शकतात,

**प्रार्थना :** ''प्रिय प्रभु आणि राजा. अमच्यापाशी असणृाया सर्व गोष्टी ह्या तुझ्याकडून मिळणारा आशीर्वाद आहे. तू आमच्या सर्व पातकांची क्षमा करुन आम्हांला सैतानापासून सोडवतोस. याचा कधी आम्हांला विसर पडतो आणी आम्ही इतरांना. क्षमा करीत नाहीं. तू करतोस तशी क्षमा आम्ही इतरांना करावी यासाठी आमचे साहाय्य कर.''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net